मानवी जीवनात मानवाधिकाराचे महत्त्व

(Importance of Human Rights in Life)

संपादक - डॉ. केशव फाले

अथर्व पब्लिकेशन्स

मानवी जीवनात मानवाधिकाराचे महत्त्व

Importance of Human Rights in Life

मुख्य संपादक

डॉ. केशव फाले

सह संपादक

प्रा.अशोक जाधव

डॉ.संतोष खंडारे

संपादन सहाय्य

प्रा.कैलास गायकवाड

प्रा.योगेश पोहोकर

प्रा.उमेश कुऱ्हाडे

प्रा.राहूल रडके

अथर्व पब्लिकेशन्स्

अथर्व पब्लिकेशन्स्

मानवी जीवनात मानवाधिकाराचे महत्त्व
Importance of Human Rights in Life

© सुरक्षित
ISBN : 978-93-85026-51-5

प्रकाशक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स्
धुळे १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे - ४२४००१.
संपर्क ९४०५२०६२३०
जळगाव तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव - ४२५००१.
संपर्क ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल atharvapublications@gmail.com
वेबसाईट www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती
२६ मे २०१५

अक्षरजुळवणी
अथर्व पब्लिकेशन्स्

मुखपृष्ठ
विशाल लोहार

मूल्य
₹ ३५०/-

- श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथील युजीसी पुरस्कृत 'मानवाधिकाराचे मानवी जीवनातील महत्त्व' या कार्यशाळेतील शोधनिबंधाचे संकलन.
- या पुस्तकात प्रसिद्ध झालेले लेख त्या त्या संबंधित लेखकांच्या व्यक्तिगत मतांवर आधारित आहेत. संपादक/संपादक मंडळ/प्रकाशक या मतांशी सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. पर्यावरणीय ऱ्हास व मानवाधिकार ०७
- प्रा. दिलीप नि. लांजेवार, वाशिम

२. बालकामगार आणि मानवाधिकार १२
-प्रा.एस.व्ही.जुनघरे, रिसोड

३. भारतीय महिला आणि मानवाधिकार १७
-श्री. सुनिल भा. चकवे, दारव्हा

४. भारतीय राज्यघटना, मानवाधिकार आणि दलित समाज २२
- प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर, दारव्हा

५. बालमजुरी व मानवाधिकार २९
-डॉ.विलास राऊत, दारव्हा

६. मानवाधिकार आणि स्त्री एक सामाजीक व आर्थीक दृष्टीकोण ३४
-प्रा. के. व्ही. ढवळे, दारव्हा

७. महिला आणि मानवाधिकार ३९
-प्रा. नितीन रमेशराव भिंगारे, दारव्हा

८. बालमजूर आणि मानवाधिकार ४४
-प्रा.पुरूषोत्तम आर.बांडे, दारव्हा

९. मानवाच्या समृध्दी करिता : शिक्षण व मानवाधिकार ५०
-प्रा. सुनिल अरूणराव डंभारे, दारव्हा

१०. मानवी हक्क आणि सर्वोच्च न्यायालयाची भुमिका ५६
-डॉ. संगीता जी. भांगडिया,अमरावती

११. मानवी हक्क आणि बिगर शासकिय संघटनाची भुमिका ६१
-प्रा. डॉ. ओमप्रकाश बी. मुंदे , अमरावती

१२. Human Rights and It's Importance In Life ६६
- Dinesh Sudhakarrao Tatte, Washim.

१३. भारतीय संविधानातील मानवी हक्क ७५
-प्रा.व्हि.बी.चांदजकर, वाशिम

१४. सामाजिकन्याय व मानवाधिकार ७९
-प्रा. बी. आर. तनपुरे, वाशिम.

१५. Human Rights & Arundhati Roy ८३
- Dr.Prachi .S.Patharkar, Washim.

१६. **Humanistic Approach in Literatures** ९२
- Asst. Prof. Bharat D. Pattebahadur, Washim

१७. **ग्रामगीता व स्त्रियांचे मानवाधिकार** ९७
-प्रा. व्ही. एन. लांडे, वाशिम

१८. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारातील मानवाधिकार** १०२
-प्रा.डॉ.शंकर मारोती सावंत, दारव्हा

१९. **मानवी हक्क आणि बालक** १०८
-निलेश रमेशराव तुरक, कारंजा

२०. **मानवाधिकार आणि महिलांची स्थिती** ११३
-मोहन तुकाराम कडु, कारंजा

२१. **महात्मा ज्योतिबा फुलेंच्या साहित्यातून मानवाधिकाराची मुहूर्तमेढ** ११६
-प्रा.प्रमोद एल.धनविजय, वाशिम

ग्रामगीता व स्त्रियांचे मानवाधिकार

प्रा. व्ही. एन. लांडे
मराठी विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यासारखे अनेकविध संत होऊन गेले आहेत. महाराष्ट्रातील संताच्या या परंपरेत आधुनिक काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा यांचेही मोलाचे योगदान आहे. संत तुकडोजी महाराज यांचा जन्म विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली या ठिकाणी झाला. तुकडोजी महाराजांनी अनेकविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजाच्या जुलूमाही विरोधात तुकडोजी महाराजांनी वेळोवेळी बंडाची भूमिका घेतली. आपल्या देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्यासाठी त्यांनी अनेक संदेश देणारे कार्यक्रम हाती घेतले. प्रामुख्याने सेवासप्ताह, स्वच्छता सप्ताह, स्वावलंबन सप्ताह, राष्ट्रीय एकात्मता सप्ताह, स्वच्छता सप्ताह, स्वावलंबन सप्ताह, राष्ट्रीय एकात्मता सप्ताह, श्रमदानयज्ञ, समयदान यज्ञ इ. कार्यही त्यांनी केले. भारतातील बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहते. त्यामुळेच खेडाचा विकास झाल्याविना देशाचा विकास होणार नाही हे सूत्र समोर ठेऊन तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' या ग्रंथाचे लेखन केले. ग्रामगीतेतून ग्रामरक्षण, ग्रामुध्दी, ग्रामनिर्माण कला, ग्रामआरोग्य, श्रमसंपत्ती, संघटनशक्ती, सेवासामर्थ्य अशा वेगवेगळ्या अध्यायांतून ग्रामसुधारणेचे अनेकविध मूलमंत्र तुकडोजी महाराजांनी सांगितले आहेत. यासोबतच 'महिलोन्नती', 'वैवाहिक जीवन' या अध्यायातून स्त्रियांच्या अधिकारासंदर्भातही तुकडोजी महाराजांनी

आपले विचार मांडले आहेत. त्याबातचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येतो.

आपल्या देशातील पारंपरिक समाजव्यस्थेने स्त्रियांचे अधिकार हिरावून घेतले. त्यांना गुलाम म्हणून वागणूक दिली. स्त्रियांकडे भोगवस्तू म्हणून पाहिले. स्त्रियांना गोधेचे वस्तू मानून घरातच डांबून ठेवण्याचाही प्रयत्न झाला. पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांना हीन, दीन, दुबळे, लाचार केले. स्त्रियांचा शिक्षणाचा अधिकारही हिरावून घेतला. स्त्रियांची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक इ. सर्वच क्षेत्रात उपेक्षा केली. स्त्रियांचा समाजव्यस्थेतील माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेतला. त्यांना अनेकविध अनिष्ट रूढी-परंपरेत गुंतवून ठेवले. पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांचे क्षेत्र अतिय संकुचित ठेवण्याचा प्रयत्न केला. 'चूल आणि मूल' या पलिकडे स्त्रिया जाणार नाहीत याकडेही कटाक्षाने लक्ष दिले. समाजव्यवस्थेने स्त्रियांना निश्चित करून दिलेली ही चौकट स्त्रियांनी ओलांडता कामा नये असा दंडक निर्माण केला. यामुळे स्त्रियांवर अन्याय, अत्याचार झाल्याचे अनेकविध उदाहरणे समाजव्यवस्थेत आढळून येतात. समाजजीवनात स्त्रियांची होणारी कुचंबना व अगतिकतेच्या विरोधात तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

समाजजीवनात पुरूषांबरोबरच स्त्रियांचेही बरोबरीने स्थान आहे. त्यामुळे पुरूष किंवा स्त्री यापैकी कोणालाही दुय्यम म्हणून वागविता कामा नये अशी स्त्री-पुरूष समानतेची भूमिका तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून व्यक्त केली आहे. पुरूषांनी मात्र आपल्या स्वार्थासाठी स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली. एकाअर्थाने शेकडो गुरूहून श्रेष्ठ ठरेल अशी योग्यता स्त्रीकडे असताना पुरूषप्रधान संस्कृतीने मात्र त्यांची अत्यंत दयनीय अवस्था करून टाकली. स्त्री ही पुरूषाला संकटप्रसंगी नेहमीच मदत करते. भविष्यात येणाऱ्या संकटाची ती अगोदरच जाणीव करून देते. मानवी स्वभावाची नेमकी पारख करून त्या पुरूषासंदर्भात योग्य अनुमान बांधून पुरूषास योग्य ते वर्तन करावयास लावते. स्त्रियांच्या ठिकाणी असलेले मातृत्वपण, ममत्व हे जगातील सर्व प्राणीमात्रांपेक्षाही श्रेष्ठ असते. स्त्री विना घराची कळा लयास जाते. खरे तर स्त्री विना विश्वाची कल्पनाही करता येत नाही. समाजजीवनात स्त्रियांचे असे अनेकविध अर्थाने महत्त्व असल्याने त्यांना सन्मानाने, आदराने समाजाने वागविले पाहिजे अशीही अपेक्षा तुकडोजी महाराजांनी व्यक्त केली आहे. स्त्रियांची अनास्था, अनादर, अपमान केल्याने समाजाचीही दुर्दशाच होत असल्याचे तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून नमूद केले आहे.

पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांचे अनेकविध अधिकार हिरावून घेतले. त्यामध्ये स्त्रियांच्या शिक्षणाचाही अधिकार हिरावल्या गेला. तुकडोजी महाराजांनी मात्र स्त्रियांचा शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे अशी आग्रही भूमिका ग्रामगीतेतून

व्यक्त केली आहे.

ते हे स्वत:सिध्द माऊलिपण। स्त्रियेअंगी सहजचि घडण।
त्याचा विकास करावया पूर्ण। उत्तम शिक्षण पाहिजे।।
(ग्रामगीता, अध्याय २०, ओवी २६)

स्त्री दक्ष राहिली तर कुंटूंबाचा व पर्यायाने समाजाचा विकास होत असतो त्यामुळे त्यांना शिक्षण द्यावे. चांगल्या चालीरीतीचे, धीटपणाचे संस्कार करावेत, त्यांना सतर्क राहण्याचे शिक्षण द्यावे. स्त्रियांना चांगले शिक्षण दिले तरच समाजही निकोप बनेल अशी भावना तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून व्यक्त केली आहे. स्त्रियांना लिहिता-वाचता येईल असे प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण तर द्यावेच याशिवाय त्यांना अन्य प्रकारचेही शिक्षण द्यावे. स्त्रियांच्या आंतरिक गुणांचा विकास होण्यासाठी त्यांनी उच्च शिक्षणही दिले जावे. याशिवाय समाजात वागण्याचे, बोलण्याचे, गायनाचेही त्यांना शिक्षण द्यावे. मुलींना शिक्षण देतांना त्यांना स्वतंत्र मुलींच्या शाळेत शिक्षण द्यावे अशीही भूमिका तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून व्यक्त केली आहे.

स्त्रियांचे अधिकार हिरावून घेणाऱ्या पुराणादि ग्रंथावरही तुकडोजी महाराजांनी प्रसंगी कठोर टीका केली आहे.

सर्व सोयी पुरूषांकरिता। स्त्रियांसाठी सर्व व्यथा।
हे कोण बोलले शास्त्र आता? । द्यावे हाता झुगारोनि।
(ग्रामगीता, अध्याय२०, ओवी १०८)

ग्रामगीतेतील यासारख्या ओवीवरून तुकडोजी महाराजांनी स्त्रियांच्या अधिकार जतन करण्याला कसे महत्त्व दिले आहे ? त्याची प्रचीती येण्यास मदत होते.

स्त्री ही पुरूषाच्या कर्तृत्त्वात कुठेही अडसर करते अशीही ओरड पुरूषप्रधान व्यवस्था नेहमीच करीत आली आहे. तुकडोजी महाराजांनी मात्र स्त्री ही पुरूषाच्या कर्तृत्त्वात कुठेही अडसर ठरत नसल्याचे आपल्या ग्रामगीतेतून नमूद केले आहे. स्त्री ही पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून कोणतेही काम करू शकते हे तुकडोजी महाराजांनी उदाहरणासहित आपल्या ग्रामगीतेतून दर्शविले आहे. इतिहासाची पाने चाळली असता स्त्रियांना जिथे संधी मिळाली तिथे त्यांनी संधीची सोने केले असल्याची माहिती मिळते. प्रामुख्याने वेद लिहिणे, ब्रह्मवाद करणे (युक्तिवाद करणे), वीर पुरूषांना घडविणे, विविध कलांची जोपासना करणे, आपल्या ब्रीदाला जागण्यासाठी प्रसंगी आपल्या प्राणाचीही पर्वा न करणे, युध्द करणे, पती-पुत्राला प्रोत्साहन देणे इ. बाबतीत स्त्रियांनी आपण कुठेही कमी नसल्याचे सिध्द करून दाखविले. स्त्री ही प्रसंगी फुलांपेक्षा मऊ व प्रसंगी वज्रापेक्षाही कठोर झाल्याचेही उदाहरण तुकडोजी महाराजांनी दिले आहे. स्त्री ही उत्तम भाषण देऊ

शकते, उत्तम वागू शकते. एवढेच नव्हे तर प्रसंगी पुरुषालाही शहाणपणाचे धडे देते. असे असताना स्त्रियांना दुय्यम वागणूक का द्यावी ? असा रोखठोक प्रश्न तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून समाजव्यवस्थेस केला आहे.

ऐसे असता दाबून ठेवावे । आजच्या युगी शोभा न पावे ।
जेथे समान हक्क असती बरवे । वर-वधूंना ।।
(ग्रामगीता, अध्याय २७, ओवी ६६)

समाजव्यवस्थेने स्त्रियांना गुलाम म्हणून वागविले. त्यांचे एकूणच हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या एकूणच हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न केला. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांना हीन, दीन, दुबळे केले. पर्यायाने त्यांनी तसेच संस्कार समाजावर केले. परिणामत: समाजातील प्रजा ही दीन, दुबळी, लाचार झाल्याचे तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून नमूद केले आहे. समाजात वाढीस लागलेल्या या लाचार प्रवृत्तीमुळेच ब्रिटीशांनी आपल्या देशाला गुलामगिरीत ठेवल्याचेही तुकडोजी महाराजांनी अप्रत्यक्षरूपात सूचविले आहे. स्त्रियांची अवहेलना, अनादर केल्याने समाजाची दुर्दशा होत असल्याचे तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून नमूद केले आहे.

पुरुषांनी आपल्या अहंकारापोटी स्त्रियांना परावलंबी केले. स्त्रियांकडे स्वाभिमान येणार नाही याची दक्षता घेतली. आपला स्वार्थ साधण्यासाठी मानवाने स्त्रियांचे जीवन रूक्ष केले. त्यांना चूल आणि मूल एवढ्यातच गुंतवून ठेवले. स्त्रियांना विद्येची ओळख होऊ दिली नाही. स्त्री घराच्या बाहेर आली तर प्रसंगी तिला पुरुषांनी मारहाण केली. तिचे अधिकार हिरावून घेल्याची खंत तुकडोजी महाराजांनी व्यक्त केली आहे. मुलीने घरात लपून राहावे व मुलाने मात्र वाटेल तसे वागावे अशा समाजाच्या रूढीवरही तुकडोजी महाराजांनी टीका केली आहे. समाजाच्या वाईट चालीरीती, प्रथा, परंपरामुळेही स्त्रियांचे अधिकार समाजव्यवस्थेने हिरावून घेतले. अशा अनिष्ट प्रथा-परंपरावरही तुकडोजी महाराजांनी खरमरीत टीका केली आहे. एखादा पुरुष ज्याप्रमाणे ब्रह्मचारी राहू शकतो, त्याचपध्दतीने स्त्रीलाही कुमारी म्हणून राहता आले पाहिजे. स्त्रिला वैधव्यानंतर दुसऱ्या विवाहास बंदी असता कामा नये. पती निधनानंतर तिच्या डोक्याचे केस काढून तिला विद्रूप करू नये, सती जाण्याचा आग्रह करू नये, संन्यासधर्माचे पालन करावयास लावू नये. विवाहापूर्वी पुरुषासारखेच स्त्रियांनाही आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. पती निधनानंतर तिच्या स्वच्छेनुसार तिला वर्तन करता यावे. बालविधवेविषयी तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून विचार व्यक्त केले आहेत.

स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून केला आहे. मुलगा झाल्यावर आनंद व्यक्त करावा व मुलीचा जन्म झाल्यावर मात्र

दु:ख व्यक्त करावे या पध्दतीवरही तुकडोजी महाराजांनी टीका केली आहे. एवढेच नव्हे तर ज्याप्रमाणे स्त्रियांचे संततिनियमन केले जाते, त्याचप्रमाणे पुरूषांचेही संतती नियमन झाले पाहिजे आीही भूमिका व्यक्त केली आहे.

पुरूषांकडून स्त्रियांना दुजाभावाची वागणूक मिळत असेल तर आावेळी स्त्रियांना आपली संघटना निर्माण करण्याचाही अधिकार असला पाहिजे यावरही तुकडोजी महाराजांनी भर दिला आहे. स्त्रियांनी संघटना उभी करून त्यातून आपल्या सुख, दु:खाच्या भावना ह्या सभा, संमेलनातून व्यक्त करता आल्या पाहिजे अशीही भूमिका तुकडोजी महाराजांनी व्यक्त केली आहे.

एकूणच ग्रामगीतेतून तुकडोजी महाराजांनी स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. पुरूषांनी स्त्रियांना दुय्यम वागणूक देता कामा नये, रूढी-परंपरेच्या जोखडाच्या गुलामगिरीत त्यांना ठेवता कामा नये, त्यांना शिक्षण द्यावे, त्यांच्या आंतरिक शक्तींचा विकास करावा, स्त्रियांना विचार स्वातंत्र्य असले पाहिजे, स्त्रियांना संघटना उभी करता आले पाहिजे, स्त्रियांना स्वत:च्या इच्छेनुसार आंतरजातीय विवाह करता आले पाहिजे, विधवानांही त्यांच्या इच्छेनुरूप पुनर्विवाह करता आला पाहिजे, स्त्रियांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य यासारख्या कोणत्याही क्षेत्रात त्यांची उपेक्षा करता कामा नये. स्त्रियांची निंदा करता कामा नये. स्त्री ही समाजाला घडविण्याचे काम करते त्यामुळे स्त्रियांना सुस्कांरित केले तरच ती समाजावर चांगले संस्कार करेल तेव्हाच निकोप अशा समाजाची निर्मितीची कल्पना शक्य होईल अन्यथा समाजाची दुर्दशा होण्यासही वेळ लागणार नाही अशीही भूमिका तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून व्यक्त केली आहे.

संदर्भ

१. ग्रामगीता, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

२. ओळख मानवाधिकाराची, डॉ. सुभाष गवई, डॉ. दया पांडे

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com
ISBN 978-93-85026-51-5